<u>उलटतपास प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री. लिपटे यांच्या वतीने शपथेवर</u>

<u>पुन्हा सुरु</u> -

८. आता मला माझ्या दाव्यातील व सरतपासातील रेखांकित भाग-अ वाचून दाखविला असता तो खरा व बरोबर नाही. दाव्यातील व सरतपासातील माहिती मी स्वतः माझ्या वकिलांना दिली होती व त्यांनी त्या आधारे दावा व सरतपासाचे शपथपत्र तयार केले. रेखांकित भाग-अ मधील माहिती मी माझ्या वकिलांना सांगितलेली होती.

**<u>प्रश्न</u>** - दावा मिळकत खोली क्र.६ चा ताबा तुम्ही कोणत्या दिवशी, किती तारखेला व कोणत्या वर्षी घेतला हे तुम्ही सांगू शकता का ?

**<u>उत्तर</u>** - पूर्वीपासून खोली क्र.६ ही रिकामी होती.

दावा दाखल करतेवेळेस दावा मिळकत खोली क्र.६ ही रिकामी होती हे दाखविण्याकरीता माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. माहे एप्रिल-२०२० मध्ये प्रतिवादी ही अनाधिकाराने दावा मिळकतीमध्ये घुसल्याबाबत मी पोलीस स्टेशनला तिच्याविरुध्द तक्रार दिली नव्हती. प्रतिवादीच्या सदरच्या कृत्याबाबत मी तिला त्याचवेळेस नोटीस पाठविलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा कब्जा मिळण्याच्या उद्देशाने मी दाव्यात आणि पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात प्रतिवादीविरुध्द असे खोटे आरोप केले आहेत.

९. माझा भाऊ दत्तात्रय हा मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याची पत्नी आशासोबत माझे ब-याच दिवसांपासून मिळकतीबाबत वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आशा दत्तात्रय सोनार हिच्या मिळकती देखील मला मिळाव्यात म्हणून मी तिच्या सोबत वाद करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खोली क्र.६ ही आशा दत्तात्रय सोनार हिच्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, सि.स.नं.३७३ ते ३८१ या मिळकतींच्या मालमत्ता पत्रकाप्रमाणे दावा मिळकत खोली क्र.६ सह इतर ३ खोल्या आशा दत्तात्रय सोनार यांच्या मालकी व ताब्यात आहेत. दि.१२/०६/१९९५ रोजी मालमत्ता पत्राकामध्ये झालेल्या या नोंदीविरुध्द मी आजपर्यंत कोठेही तक्रार केली नाही.

नि.दि.दा.क्र.६३/२०२२
नि.क्र.२५

१०. प्रतिवादी ही सुरुवातीपासून आशा दत्तात्रय सोनार यांची भाडेकरु असल्याचे मला माहित नाही. दावा मिळकतीचे सुरुवातीपासूनचे भाडे प्रतिवादी ही आशा दत्तात्रय सोनार हिला अदा करत आलेली आहे, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी ही "टी.एम. सोनार" या चाळीमध्ये मागील २० वर्षांपासून राहते, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी ही मागील २० वर्षांपासून दावा मिळकतीचे विद्यूत देयक अदा करत आलेली आहे, याबाबत मला माहिती नाही.

**<u>प्रश्न</u>** - दावा मिळकत खोली क्र.६ चे विद्यूत देयक तुम्ही अदा करतात याबाबत तुम्ही पुरावा दाखल करु शकता का ?

**<u>उत्तर</u>** - दावा मिळकतीचे विद्यूत देयक माझ्यापर्यंत येत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खोली क्र.६ या मिळकतीचा ताबा माझ्याकडे कधीच नव्हता म्हणून मी त्या खोलीचे विद्यूत देयक सादर करु शकत नाही. दावा दाखल करण्यापूर्वी मी प्रतिवादीला नोटीस पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि.२३/११/२०२१ रोजी मी विधिज्ञ श्री.ए.पी.परदेशी यांच्यामार्फत प्रतिवादीला दाव्यात नमूद पत्त्यावर नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी ही मागील २० वर्षांपासून दाव्यात नमूद पत्त्यावर राहत असल्याने मी त्या पत्त्यावर तिला नोटीस पाठविली. प्रतिवादी ही मागील २० वर्षांपासून दावा मिळकत खोली क्र.६ मध्ये राहत असल्याने त्या पत्त्यावरील तिचे आधारकार्ड व इतर दस्त असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचा ताबा मिळण्याच्या उद्देशाने मी दाव्यात व सरतपासात संपूर्णपणे खोटे कथन केले व खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.10.09 17:31:47 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ०९/१०/२०२५